# जेजुरी नगरपरिषद,जेजुरी

## श्री.क्षेत्र जेजुरी ता.पुरंदर,जि.पुणे४१२३०३

संपर्कः-०२११५-२५३१२३ ई-मेलः-jn6396@gmail.com


जा.क्र.जेनपा/कावि/ ८२३ /२०२६ दिनांकः- २१/०४/२०२६.

प्रति,

मा.व्यवस्थापक सो,

दै.लोकमत

**विषय:-जाहिर ई-निविदा प्रसिध्द करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की,जेजुरी नगरपरिषदेची सोबत जोडलेली जाहिर ई-निविदा सुचना आपल्या **दै.लोकमत** मध्ये दिनांकः-२२/०४/२०२६ रोजीच्या वर्तमान पत्रामध्ये कमीत कमी जागेत प्रसिध्द करणेत यावी व होणारे बील ०३ (तीन )वृत पत्रांच्या प्रतीं सह जेजुरी नगरपरिषदेस पाठविण्यात यावे.

कळावे,

आपला विश्वासू

(चारुदत्त इंगुले)

मुख्याधिकारी

जेजुरी नगरपरिषद,जेजुरी

# जेजुरी नगरपरिषद,जेजुरी ता.पुरंदर जि.पुणे

## ईनिविदा

## ई-निविदा सूचना क्रमांक, jejurimc/Civil/०८/२०२६

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र.जेनपा/कावि/ ८२३ /२०२६.
दिनांक:-२० / ०४/२०२६

जेजुरी नगरपरिषद करीता **ई निविदा सूचना क्रमांक, jejurimc/Civil/०८/२०२६** ई-निविदा पध्दतीने मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा दिनांक **२२/०४/२०२६** रोजी सकाळी ११.००वा. पासून भरण्यास उपलब्ध आहे. याबाबतचे शुध्दी पत्रके महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहण्यास /भरण्यास उपलब्ध आहे

(चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद,जेजुरी

# जेजुरी नगरपरिषद, जेजुरी ता. पुरंदर जि. पुणे

**ई- निविदांतर्गत निविदा सूचना क्रमांक jejurimc/Civil/०८/२०२६**

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र. जेनपा / कावि/ ८२३/२०२६
दिनांक :- २१/०४/२०२६.

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी जेजुरी नगरपरिषद, जेजुरी यांचेतर्फे बांधकाम विभागाकडील वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत व्दिलिफाफा पद्धतीने खालील कामाच्या ई- निविदा मागविणत येत आहेत. खालील कामांच्या निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना व कामाचा तपशील तसेच सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (बेबसाईटवर) दि.२२/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासुन पाहण्यास उपलब्ध होईल. सदरील निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडून खालील कामांच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| टेंडर क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रूपये | निविदा फी रू. (नापरतावा) | बयाणा रक्कम रू. १% | सुरक्षा अनामत रू.२% | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| | वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत "नमो उद्यान " विकसित करणे | | | | | |
| १. | जेजुरी नगरपरिषद हद्दीतील गट क्र ०२ जुने पालखी मैदान येथे नमो उद्यान विकसित करणे | ८४,८६,११९ | ८,००० | ८४,८६१ | १,६९,७२२ | ६ महिने |

**ई - निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| **ई - निविदा प्रसिध्दी** | दिनांक २२/०४/२०२६ वेळ स. ११.०० वा. |
| **ई - निविदा दस्ताऐवज डाऊनलोड** | दिनांक २२/०४/२०२६ वेळ स. ११.०० वा. ते २९/०४/२०२६ ला ०६.०० वाजेपर्यंत. |
| **ई - निविदा दाखल अखेरचा दिनांक** | दिनांक २९/०४/२०२६ ला ०६.०० वाजेपर्यंत. |
| **ई-निविदा लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक** | दिनांक ०४/०५/२०२६ ला दु. १२.०० नंतर (शक्य असल्यास) |
| **ई-निविदा लिफाफा क्र. २ (व्यापारी लिफाफा) उघडण्याचा दिनांक** | दिनांक ०६/०५/२०२६ ला दु. १२.०० नंतर (शक्य असल्यास) |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय अज्ञावलीत होईल.
२. वरील कामाचे निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे , अटी, शर्ती इ.सदर संकेतस्थळावरुन प्राप्त होईल .
३. वरील कामांच्या निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करता येईल.

## जेजुरी नगरपरिषद, जेजुरी, जि. पुणे
## निविदा भरण्याची कार्यपध्दती

➢ **तांत्रिक लिफाफा (लिफाफा क्र. १) -**

१. निविदा फी व अनामत रक्कम Net Banking द्वारे शुल्क अदा करावे. तसेच ई-निविदेसोबत स्कॅन केलेल्या स्वरूपात ई-निविदा अपलोड करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय निविदा धारकाची निविदा वैध राहणार नाही. व निविदा उघडण्यात येणार नाही.

२. कंत्राटदार सार्व. बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र ( फोटोसहीत ) स्कॅन करुन अपलोड (Upload ) करावी लागेल.

३. प्राप्तीकर पॅन कार्ड, G.S.T. प्रमाणपत्र अपलोड (Upload) करावे लागेल.

४. शासकीय/निमशासकीय/शासनमान्य संस्थेकडे केलेल्या कामाचे व हातात असलेल्या कामाचे तसेच त्यासाठी पुर्ण केलेल्या कामांचे, संबंधीत विभागाचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले विहीत नमून्यातील Workdone Certificate अपलोड करणे आवश्यक आहे. यामध्ये फक्त उद्यान /बगीचा विकसित करणे कामांचा समावेश असावा.

५. निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यांवर अथवा निविदा मंजुरी नंतर कामाच्या कोणत्याही टप्यावर कागदपत्राच्या विधी ग्राह्यतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर/फौजदारी कार्यवाहीस प्राप्त राहील व काम रद्द करण्यास व वसुलिस व जप्तीस पात्र राहील.

६. ऑनलाईन निविदा खरेदी करताना अथवा भरताना कोणत्याही कारणास्तव इंटरनेट, सर्व्हर, इजेक्टीकल इ. किंवा अन्य कारणांमुळ अडथळा आल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.

७. सब टेंडर देता येणार नाही.

८. ठेकेदार ब्लॅक लिस्टेड नसावा, त्याबाबत हमी पत्र अपलोड करणे आवश्यक राहील.

९. शासन निर्देशानुसार EPF बाबत आवश्यक पुर्तता करणे आवश्यक आहे.

१०. Labour Insurance ची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

११. ठेकेदाराने स्वत:चे नाव, पत्त, फोन नं., ई - मेल आयडी इ. पत्र व्यवहारासाठी देणे आवश्यक आहे तसे प्रमाणपत्र अपलोड करावे. याच पत्त्यावर व फोन नं. वर पत्र व्यवहार केला जाईल. या करीता वापरात असलेली माहिती द्यावी.

१२. Machinary Availability Statement अपलोड करणे आवश्यक राहील. त्या करीता Machinary खरेदीची व विम्याची कागदपत्रे अपलोड करावी अथवा Machinary उपलब्धतेबाबतची करारनामा अपलोड करावा.

१३. कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे, त्याबाबतचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक राहील. त्या करीता कर्मचारी व अधिकारी यांची शैक्षणिक व अनुभवाची कागदपत्रे, प्रमाणपत्रे व त्यांना ठेकेदाराच्या अस्थापनेवर नियुक्त केलेचे नियुक्तीपत्र अपलोड करावे.

१४. तज्ञ व अनुभवी कर्मचारी व अधिकारी उपलब्धता असलेबाबत प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक राहील.

१५. याच प्रकारच्या कंत्राटांची यशस्वी अंमलबजावणी करून काम पुर्ण केलेला अनुभव व तांत्रीक कौशल्य याबाबत प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक राहील.

१६. कोणत्या शासकीय अथवा स्थानीक स्वराज्य संस्थेकडून ज्याच्या विरुध्द कारवाई करण्यात आलेली असेल अशा कंत्राटदारास निविदेमध्ये भाग घेता येणार नाही.

१७. निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची भरल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामतची शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे बंधनकारक असेल.

१८. कामाचे थर्ड पार्टी ऑडीट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे (COEP) यांच्याकडून करुन घेणे आवश्यक राहील

१९. मटेरिअलची गुणवत्ता तपासणी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे (COEP) करून घेणे आवश्यक राहील

२०. Price Escalation आणि शासकीय दरसुचीमधील दरफरक वाढीव बाजारभावाप्रमाणे मिळणार नाही.

२१. बांधकाम/रोड काम करते वेळी सर्व प्रकारच्या सुरक्षा उपाय योजनांचा अंमलबजावणी कंत्राटदाराने करणे आवश्यक राहील.

२२. निविदा प्रक्रियेतील सर्व अटी व शर्तीसुध्दा करारपत्राचा भाग समजला जाईल.

२३. निविदा प्रप्त्रातील व नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारी राहतील. तसेच सर्व निविदा कोणते ही कारण न देता फेटाळण्याचा अधिकारी मुख्याधिकारी यांना राखुन ठेवला असुन निविदा भरणाऱ्या कोणत्याही ठेकेदाला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

२४. शासनाने वेळोवेळी केलेले कायदे, नियम, अटी,शर्ती,नोंदणी,कपाती व इतर आवश्यक कारवाई शासनाने केल्याप्रमाणे ठेकेदारास/ मक्तेदारास बंधनकारक राहील.

२५. भविष्यात शासनाकडून कोणत्याही प्रकारची वसुली निघाल्यास विना तक्रार एक रकमी भरणे ठेकेदारास/मक्तेदारास बंधकारक राहील.

२६. कामाची सुरक्षा ठेव काम पुर्ण झाल्यानंतर शासन निर्णयानुसार परत देण्यात येईल.

२७. सदरील ठेकेदाराने त्यांच्याकडे काम करित असलेल्या कामगारांचा कर्मचारी राज्य विमा भरणे बंधनकारक राहील. व त्याची चलने नगरपरिषद कार्यालयात सादर करावी तद्नंतरच बिलाची रक्कम अदा करण्यात येईल.

२८. ठेकेदाराने स्वत:चे नाव, पत्त, फोन नं., ई - मेल आयडी इ. पत्र व्यवहारासाठी देणे आवश्यक आहे तसे प्रमाणपत्र अपलोड करावे. याच पत्त्यावर व फोन नं. वर पत्र व्यवहार केला जाईल. या करीता वापरात असलेली माहिती द्यावी.

**व्यापारी लिफाफा (लिफाफा क्र. २) -**

१. महाराष्ट्र शासन सा.बां.वि.शासन निर्णय क्रमांक:सीएटी /२०१७ /प्र.क्र,०८/इमा-२ दिनांक २७/०९/२०१८ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही व्हावी.

२. पात्र निविदा धारकाकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कम हि कामाचा करारनामा करतेवेळी मा. मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद,जेजुरी यांचे नावे चलनाने रोख स्वरूपात किंवा RTGS किंवा NEFT किंवा D.D. स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम देयकांतून कपात केली जाईल.

३. सदर निविदेतील इतर बंधनकारक अटी व शर्ती सोबतच्या निविदा पत्रकामध्ये राहतील.

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.सुनिल ताजवे<br>नगर अभियंता<br>जे.न.पा. | श्री.गणेश रणदिवे<br>लेखापाल<br>जे.न.पा | श्री.अमर शेडगे<br>अंतर्गत लेखापरिक्षक<br>जे.न.पा | श्री.चारुदत्त इंगुले<br>मुख्याधिकारी<br>जे.न.पा. |

JEJURI MUNICIPAL COUNCIL
जेजुरी नगरपरिषद
DIST. POONA

Signature Not Verified
Digitally signed by Sunil Martand Tajave
Date: 2026.04.21 18:22:09 IST
Location: Maharashtra-MH